# शहरात हरवलेली मनी माऊ



मनी माऊ ही शहरात राहणारी मांजर. लीना तिची मालकीण होती. मनी माऊ लीनाबरोबर तिच्या घरात राहायची. मनी अगदी लहान असताना लीनाने तिला आपल्या घरी आणले होते. तेव्हा मनी लोकरीच्या गुंड्यासारखी होती. आता मनी मोठी मांजर झाली होती. पण ती कधीच घराबाहेर पडली नव्हती.

एकदा मनी तिच्या आवडत्या गादीवर झोपली होती. तिचे दाराकडे लक्ष गेले. दार तर उघडेच होते. मनी दारात गेली. तिने दारातून बाहेर पाहिले. मनी दारातून बाहेर पळाली. जिना उतरून रस्त्यावर गेली.

बाहेर उंचच उंच झाडे होती. उंचच उंच घरे होती. मनी झाडांच्या गराड्यात सापडली. मनी घरांच्या गराड्यात सापडली. मनी माणसांच्या गराड्यात सापडली. आजूबाजूला यंत्रांचे आवाज येत होते. गाड्यांचे आवाज येत होते. माणसांचे आवाज येत होते.

बाहेर कचऱ्याचा घाण वास येत होता. गाड्यांच्या धुराचा वास येत होता. चालणाऱ्या माणसांचे पाय मनीला लागत होते. मनीला वाटले की आता तिला गाडीची धडक लागणार. मनीला खूप भीती वाटली.

मनीला शहर काही आवडले नाही. तिने ठरवले की आपण घरी परत जाऊ.

~~~

© Triveni Marathi Shala, Cincinnati, OH
~~~

1. खालील जोडाक्षरे लिहा. जोडाक्षरांचा वापर केलेल्या धड्यातील शब्दांना गोल करा. नवीन शब्द शोधून लिहा.

   ड + य = ड्य ----------------------------------------------------------

   त + य = त्य ----------------------------------------------------------

   च + य = च्य ----------------------------------------------------------

   र + य = र्‍य ----------------------------------------------------------

2. खालील शब्द वापरून वाक्ये तयार करा.

   अगदी, कधीच, गराडा, ठरवले, धडक

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

3. शब्दाचे रूप बदला

   दार -> दाराला, झाड ->

   दार -> दारावर, झाड ->

© Triveni Marathi Shala, Cincinnati, OH

दार -> दाराकडे, झाड ->

दार -> दारातून, झाड ->

दार -> दारात, झाड ->

दार -> दारापासून, झाड ->

४. धड्यातून वाक्य शोधा. सर्वानामाच्या जागी नाम वापरा.

लीना तिची ( ) मालकीण होती. -> लीना ~~तिची~~ (मनीमाऊची) मालकीण होती.

लीनाने तिला ( ) घरी आणले होते.

पण ती ( )घराबाहेर कधीच पडली नव्हती.

तिचे ( ) दाराकडे लक्ष गेले.

तिने ( ) ठरवले की आपण घरी परत जाऊ.

५. क्रीयापदाचे योग्य रूप निवडा

मनी घरातून बाहेर (पडला / पडली).

कचऱ्याचा घाण वास (येतो / येते).

गाडीचा आवाज (येते / येतो).

लीना मनीची मालकीण (होता / होती).

4. विचार करा आणि सांगा: मनीला शहर आवडले का? का?

© Triveni Marathi Shala, Cincinnati, OH